
९९६०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. २९७



# क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति

## उज्जयिनी



REFBK-0011401

सन १९६०

सांस्कृतिक भारत दर्शन

दा. क्र. ९७४०७
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
अनुक्रम २११९
क्रमांक २९७

REFBK-0011401

आनंदयात्री

# क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति

## श्रीक्षेत्र उज्जयिनी

वोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

श्री : २५०

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई

आवृत्ति पहिली : १९६०

किंमत ८० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड करिता
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

मुद्रक :
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण पेठ,
पुणे २



११४०९


# क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति

## [ श्रीक्षेत्र उज्जयिनी ]

### क्षिप्रा नदीच्या तटीं :

भारताच्या सांस्कृतिक इतिहासांत उज्जयिनीचें स्थान महनीय आहे ही प्राचीन नगरी माळव्यांतील क्षिप्रा नदीच्या पूर्वतीरावर वसलेली आहे इतिहास-पूर्व काळापासून या नगरीची प्रसिद्धि आहे बौधायनसूत्रें, रामायण आणि महाभारत या प्राचीन ग्रंथांत उज्जयिनीचे उल्लेख आढळतात विद्या आणि व्यापार याचें केंद्र म्हणून फार प्राचीन काळापासून या नगरीची प्रसिद्धि आहे. भारतीय ज्योतिर्विदांनीं या नगरीला जगताचा मध्यबिंदु मानून शून्य रेखांशावर बसविलें होतें पुरी, रामेश्वर, द्वारका आणि बदरिकाश्रम या चारी धामांच्या यात्रेचा मध्यबिंदूहि उज्जयिनीचा महाकालेश्वरच मानला जातो. विक्रमशाली सम्राटांची राजधानी, महाकवींची

विलासभूमि, धार्मिकांची श्रद्धाभूमि, तपोनिधि विद्यावंतांची तपोभूमि आणि समृद्धीची खाण असलेली ही पुरातन नगरी यात्रिकांचें नित्य स्वागत करीत आजहि क्षिप्रेच्या तीरीं हंसतमुखानें उभी आहे. या नगरीच्या प्रदीर्घ जीवनातील सोनेरी स्मृति हृदयांत सांठवून क्षिप्रेचा प्रवाह प्रसन्नतेनें वहात आहे महाकालाच्या दर्शनासाठीं आलेल्या यात्रिकांना आपलें हृदय



क्षिप्रानदीवरील घाट

सागण्यासाठीं क्षिप्रा सदैव आतुर झालेली असते. सूर्याच्या सोनेरी किरणांत न्हालेल्या तिच्या जळकांतीवर पूर्ववैभवाच्या अभिमानाचें विलक्षण तेज आजहि चमकत असतें.

## आगळी अवन्तिका :

क्षिप्रेच्या हृदयांत रिघून आपण उज्जयिनीच्या पूर्ववैभवाचा शोध घेऊं लागलों कीं, आपलेंहि हृदय क्षिप्रेप्रमाणेंच आनंदलहरींवर नाचूं लागतें. उज्जयिनी हें बारा ज्योतिर्लिंगांतील महाकालेश्वराचें स्थान. या स्थानाचा महिमा पुराणानीं शतकठांनीं गायिला आहे स्कंद पुराणातील अवन्तिखंडात उज्जयिनीची गौरवगाथा गाण्यासाठीं अनेक अध्याय खर्ची पडले आहेत या नगरीला प्राचीन काळांत कनकशृंगा, कुशस्थली, अवन्ती, उज्जयिनी, पद्मावती, कुमुद्वती, अमरावती आणि विशाला अशीं सार्थ नावें होतीं गगनचुंबी प्रासादाच्या सोनेरी शिखरांनीं शोभणारी ती

सहस्रपदविस्तीर्णं महाकालवनं शुभम् ।
द्वारं महार्घरत्नाद्यैः खचितं सौम्यदिग्भवम् ॥

'कनकशृंगा'; देवादिकांच्या आणि तपोनिधींच्या पवित्र दर्भासनामुळें ( कुश = दर्भ ) शोभणारी ती 'कुशस्थली'; देव, तीर्थ आणि औषधी यांचीं बीजें प्रलयाच्या वेळीं राखणारी ती 'अवन्ती'; जिथें शंकरानें त्रिपुरासुरादि दैत्यांवर विजय मिळविला ती 'उज्जयिनी', समुद्रमंथनानंतर विष्णूनें लक्ष्मीसह जिथें वास केला, ती 'पद्मावती'; जेथील जलाशयांत सदैव कुमुदें फुललेलीं असत, ती 'कुमुद्वती'; देवांच्या राजधानीला लाजविणारें वैभव जिथें नांदत होतें ती 'अमरावती'; आणि जी आपल्या वैभवानें व विस्तारानें शोभत होती ती 'विशाला' — असा उज्जयिनीचा प्राचीन नामगौरव आहे या सर्व नाममालिकेंत 'अवन्ती' अथवा 'अवन्तिका' हें नांव विशेष प्रचलित होतें या केंद्रवर्ती नगरीच्या नांवामुळें मालव प्रदेशालाहि 'अवन्तिदेश' असें म्हणत असत येथें भद्रसेन, गंधर्वसेन, रणकदेव, प्रद्योत, शूद्रक इत्यादि राजांनीं राज्य केल्याच्या कथा पुराण-ग्रंथांतून व काव्य-कथांतून आढळतात महाकवि कालिदास, मृच्छकटिककार शूद्रक, कादंबरीकार बाणभट्ट, कथासरित्सागरकार सोमदेवभट्ट याच्या काव्यकृतींत उज्जयिनीच्या वैभवाचीं आणि समृद्धीची मनोरम चित्रें रेखाटलेलीं आहेत.

**स्वर्गाचा झगझगीत तुकडा :**

या नगरीच्या वैभवाचें वर्णन करताना कविकुलगुरु कालिदासाच्या प्रतिभेला उत्साहाचें आणि अभिमानाचें भरतें आलें आहे : " त्या अवन्तिदेशांतील ती विशाला नगरी ऐश्वर्यानें विशाल बनलेली आहे. ती नगरी

म्हणजे जणुं कांहीं स्वर्गस्थ लोकांनीं अवशिष्ट पुण्याई-च्या बळावर स्वर्गांतून पृथ्वीवर येतांना सांगातीं आणलेला स्वर्गाचा एक झगझगीत तुकडाच होय. तेथें नित्य पहाटे क्षिप्रेच्या तरंगांनीं शीतल बनलेला वारा प्रियस्पर्शाप्रमाणें अवयवांना उल्हसित करीत असतो. प्रफुल्ल कमळांच्या सुगंधानें भारावलेल्या त्या वाऱ्यामुळें सारसांचें मधुर कूजन दूरवरून कानांना सुख देत असतें. त्या नगरीच्या सराफपेठेंत, मध्यें महारत्नें गुंफलेले मोत्यांचे झळझळीत हार, कोट्यवधि शंख-शिंपले, कोंवळ्या गवताप्रमाणें हिरवेगार व किरणशलाका उधळणारे पाचू, तसेंच पोवळ्याचे तुकडे पाहिले म्हणजे असें वाटतें कीं, सारें रत्नभांडार लुटून आणल्या-मुळें समुद्रात आता केवळ पाणीच उरलेलें आहे कमळपरागाच्या सुगंधांनीं आणि जलविहारांत निमग्न झालेल्या तरुणींच्या स्नानांनीं सुवासिक झालेल्या शीतल झुळुकांनीं नदीकाठचीं उद्यानें सारखीं डोलत असतात. तेथें महाकालाच्या सायंकालीन पूजेच्या वेळीं मंदिरांत वारांगनांचें नर्तन चालू असतें नृत्याच्या वेळीं त्यांच्या मेखलांच्या घुंगुरांचा आणि पायातील पैंजणाचा ध्वनि साऱ्या प्राकारांत घुमत असतो. ''

**महाकालाच्या मंदिरांत :**

उज्जयिनीचा महाकालेश्वर बारा ज्योतिर्लिंगांत प्रसिद्ध आहे. महाभारतांतील वनपर्वात, स्कंद, मत्स्य व नृसिंह या पुराणांत आणि श्रीधरस्वामींच्या 'शिवलीलामृतां'त महाकालाचा महिमा वर्णिलेला आहे अल्‌बेरुणी आणि फेरिश्ता या विदेशी भारत-प्रवाशांनीं महाकालाच्या मंदिराचें वर्णन केलें आहे पुराणकल्पनेनुसार महाकालाचें मंदिर प्रथम प्रत्यक्ष विश्वकर्म्यानें उभारलें. विश्वकर्म्यानें बांधलेल्या या मंदिराच्या गगनचुंबी सुवर्णशिखरामुळें उज्जयिनीला 'स्वर्णशृंगा' असें एक नाव पडलें, असें म्हणतात जुन्या ग्रंथांतून महाकाल-मंदिराच्या भव्यतेचीं व वैभवाचीं वर्णनें अनेक आढळतात हें पुरातन मंदिर प्रशस्त व भव्य होतें. त्याचा विस्तीर्ण सभामंडप नक्षीदार दगडी खांबांवर उभारलेला होता. सभामंडपाच्या महाद्वारावर एक प्रचंड घंटा सोन्याच्या साखळीनें टांगलेली होती आणि

आदित्यदासतनयस्तदवाप्तबोधः ।
कापित्थके सवितृलब्धवरप्रसादः ॥
आवन्तिकोमुनिमतान्यवलोक्य सम्यग् ।
होरांवराहमिहिरो रुचिरांचकार ॥

त्या घंटेवर मूल्यवान् मोत्याची झालर लोंबत होती मंदिराच्या गाभाऱ्यांत रत्नखचित दीपस्तंभ उभारलेले होते आणि त्यांवर अखंड तेवणाऱ्या दीपाच्या प्रकाशांत महाकालाचें तें पवित्र शिवलिंग यात्रिकांच्या नेत्रांचें पारणें फेडीत होतें

इतिहास-काळांत या मंदिराशीं विक्रमादित्याचें नांव निकट संबंधित आहे. विक्रमादित्यानें उभारलेल्या महाकाल-मंदिराचें शिखर दूरवरून दिसत असे मंदिराच्या सभामंडपात विक्रमादित्याची सुवर्ण-प्रतिमा होती. त्याच्या काळांत महाकालाच्या उत्सव-मूर्तीवर रत्नांचे अलंकार चढविले जात; रत्नांनीं भूषविलेलीं सोन्याचीं उपकरणें नित्य पूजेसाठीं वापरलीं जात आणि शिवलिंगावर गंगाजलाचा नित्य अभिषेक होत असे विक्रमादित्याच्या काळात महाकालाचें मंदिर म्हणजे संस्कृत-शारदेची नृत्यभूमि बनली होती. स्वत: महाकवि कालिदास महाकालेश्वराच्या सायंकालीन आरतीच्या वेळीं अनेकदां उपस्थित असे आणि आपल्या भावसमृद्ध हृदयांत शिवाचें तेज सांठवीत असे.

विक्रमादित्यानंतर अनेक शतकानीं, इसवी सनाच्या अकराव्या शतकात परमारवंशीय भोज राजानें या मंदिराचा जीर्णोद्धार केला. भोज राजानें जीर्णोद्धाराच्या वेळीं मूळ मंदिराचा बराच विस्तार केला आणि मंदिराभोंवतीं शंभर गज उंचीचा उत्तुंग कोट उभा केला भोजाच्या काळांत महाकालाचें वैभव खूपच वाढलेलें होतें या सांपत्तिक वैभवाच्या मोहानें आणि धर्मवेडानें झपाटलेल्या शमसुद्दीन अल्तमशानें इ स १२३५-मध्यें हें मंदिर उद्ध्वस्त केलें, देवाची उत्सवमूर्ति आणि विक्रमादित्याचा पुतळा यांसह मंदिरातील संपत्ति लुटून नेली; महाकालाचें लिंग

मुळापासून खणून कोटितीर्थात ढकलून दिलें आणि मंदिराची मशीद बनवून आपली आसुरी आकांक्षा तृप्त केली.

पुढें पांचशें वर्षांनीं राणोजींचे दिवाण रामचंद्रबाबा शेणवी यांनीं ही मशीद पाडली आणि त्या जागीं इ. स. १७४५ मध्यें पुन· महाकाल-मंदिर उभारून त्यांत कोटितीर्थांत पडून राहिलेलें शिवलिंग स्थापिलें. हल्लींचें महाकालेश्वराचें मंदिर तें हेंच होय. या मंदिराच्या आवाराच्या दक्षिण, उत्तर व पूर्व या तीन बाजूंचे सोपे आणि पूर्वेकडील नगारखान्याचा दरवाजा व उत्तरेकडील लहान दरवाजा यांच्या बांधणीवरून असें दिसतें कीं, हे भाग त्या मशिदीच्या चौसोपीचेच अवशेष असावेत. हल्लीं त्या सोप्याचा धर्मशाळेसारखा उपयोग केला जातो. मंदिराचें महाद्वार दक्षिणाभिमुख आहे. समोर नंदिकेश्वराची मूर्ति आहे. गाभाऱ्याच्या आंत देवाच्या तिन्ही बाजूंस कोनाड्यांत पश्चिमेस गणपति, उत्तरेस पार्वती व पूर्वेस षडानन अशा मूर्ति आहेत गाभाऱ्यांत सर्वत्र संगमरवराची फरशी बसविलेली आहे. महाकालेश्वराची शाळुंका चांदीच्या पत्र्यानें मढविलेली आहे. हें शालिग्रामशिळेचें शिवलिंग आकारानें मोठें असून सतेज आहे. महाकालेश्वरापुढें एक तेलाचा व एक तुपाचा असे दोन नदादीप अखंड तेवत असतात. ग्वाल्हेर दरबारनें दिलेला चौघडा महाद्वारावर नित्य दोन-दोन प्रहराच्या अंतरानें झडत असतो

महाकालेश्वराच्या नित्योपासनेंत रोज चार पूजा होत असतात : एक भस्मपूजा व तीन षोडषोपचारपूजा. भस्मपूजा पंचपंच उष:कालीं होते या पूजेच्या वेळीं प्रथम पंचोपचार-पूजन करून नतर चिताभस्माचें लेपन करतात आणि मग कांकडआरती होते नतर प्रथमपूजा सकाळीं होते; मध्यान्हीं महापूजा होते आणि सायंकाळीं प्रदोषपूजा होते

शिवाच्या उपासनेंत सोमवारांचें विशेष महत्त्व श्रावणी सोमवारीं तर छोट्या प्रमाणांत यात्राच लोटते. सायंकाळी शिवाच्या उत्सवमूर्तीची पालखींतून मिरवणूक निघते देवाची पालखी वाजत-गाजत मंदिरातून क्षिप्रातीरीं जाते तेथें महाकालेश्वर व क्षिप्रादेवी याची भेट झाल्यानंतर पालखी गोपालकृष्णाच्या मंदिरावरून बाजारांतून मिरवत मिरवत मंदिरात परत येते दसऱ्याच्या दिवशींहि देव पालखींतून सीमोल्लंघनाला जातो.



वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशीं हरिहर-भेटीचा सोहळा असतो या दिवशीं गोपालकृष्ण व महाकालेश्वर परस्परां-च्या भेटीसाठीं परस्परा-च्या मंदिरांत थाटा-माटानें वाजतगाजत जातात आणि परस्परां-चा सत्कार करतात महाकालेश्वर तुलसी-पत्रानें गोपालकृष्णाचें पूजन करतो आणि गोपालकृष्ण बिल्व-पत्रानें महाकालाचें पूजन करतो ही हरि-हर-भेटीच्या सोहळ्याची प्रथा महाराणी बायजाबाई यानीं सुरू केली

महाशिवरात्र ही पर्वणी उज्जयिनीच्या वार्षिक जीवनात अत्यंत महत्त्वाची आहे या दिवशीं येथें अमाप यात्रा लोटलेली असते मंदिराचा परिसर यात्रेकरूंनीं फुलून गेलेला असतो पूजाद्रव्याची नि प्रसादवस्तूंचीं दुकाने अनेक असतात. महाकालेश्वरावर बिल्वपत्रांचा वर्षाव होत असतो आणि महाकालेश्वराप्रीत्यर्थ मंदिराबाहेर कोटेश्वरावर एकादशण्यांची वृष्टि झडत असते.



शिवरात्रीच्या दिवशीं प्रदोषपूजेनंतर नित्याप्रमाणें शेजारती होत नाहीं प्रदोषपूजेनंतर रात्रीं आणखी एक महापूजा होते ही महापूजा अत्यंत प्रेक्षणीय असते ती पाहण्यासाठीं अनेक लोक शुचिर्भूत होऊन आलेले असतात या पूजेचा विधि रात्रीं १० च्या सुमारास सुरू होऊन दुसऱ्या दिवशींच्या सूर्योदयापर्यंत चालू असतो पंचामृतपूजा, धान्यपूजा आणि पुष्पपूजा असें या पूजेचें त्रिविध स्वरूप असते रात्रींच्या प्रशान्त वेळीं गंभीर वैदिक मंत्रांनीं चाललेली ही पूजा भाविकांच्या नि भक्तांच्या मनावर विलक्षण प्रभाव पाडते वेदमंत्रपूर्वक पंचामृतपूजा आटोपल्यावर नाना प्रकारच्या धान्यराशीमध्यें शोभणारी आणि विविध पुष्पांच्या भव्य आणि सुंदर मुकुटानें विभूषित झालेली शिवमूर्ति पाहतांना हृदय विलक्षण भक्तिभावानें उचंबळून येतें. पारण्याच्या दिवशीं सकाळीं ९ वाजण्याच्या सुमारास या पूजेचें विसर्जन होऊन नित्याची भस्मपूजा होत असते.

**कांहीं प्रसिद्ध मंदिरें व पवित्र स्थानें :**

महाकालाच्या भारतविख्यात मंदिराशिवाय उज्जयिनींत अनेक प्रसिद्ध मंदिरें आहेत हरसिद्धिदेवीचें मंदिर, गोपाळकृष्ण-मंदिर, अंगारकेश्वर-मंदिर, महाकाली-मंदिर व कालभैरव-मंदिर हीं मंदिरें विशेष प्रसिद्ध आहेत

**श्रीहरसिद्धिदेवी :** हरसिद्धिदेवीचें स्थान जोगीपुऱ्यांत रुद्रसागराच्या पश्चिम तीरावर आहे मंदिराच्याभोंवतीं उंच दगडी कोट असून त्याला चारी बाजूंस द्वारें आहेत पूर्व व उत्तर या दोन द्वारांवर बसण्यासाठीं बाराद्ऱ्या बांधलेल्या आहेत. पूर्वेकडील दरवाजाखालीं एक लहानशी गुंफा आहे मंदिराच्या पूर्वद्वारालगत रुद्रसागर आहे एके काळीं विपुल जलानें आणि लाल कमळानीं शोभणारा हा तलाव आता मातीनें बराच बुजून गेला आहे. या मंदिराची बांधणी हेमाडपती पद्धतीची आहे आकारानें फारसें मोठें नसलेलें हें मजबूत बांधणीचें मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराच्या द्वारमंडपात व्याघ्राची दगडी प्रतिमा बसविलेली आहे महाद्वारापुढें दोन दीपस्तंभ उभारलेले आहेत महाद्वारांतून आंत शिरल्यावर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम ३११२ दि १५-५-७१

एक प्रशस्त चौकोनी सभामंडप लागतो. या मंडपापुढें देवीचा लहानसा गाभारा आहे गाभाऱ्यात देवीची मूर्ति नसून सिंहासनावर 'श्रीयंत्र' कोरलेली एक शिला आहे या श्रीयंत्राकित शिलेलाच श्रीहरसिद्धिदेवी असें म्हणतात. श्रीयंत्राच्या पश्चिम बाजूस एक देवीची उभी मूर्ति आहे, ती अन्नपूर्णा होय. सकाळ-सध्याकाळ पूजा व आरती आणि सप्तशतीचा पाठ ही येथील नित्यार्चना होय. शारदीय नवरात्राचा उत्सव येथें फारच थाटानें साजरा होतो विक्रमादित्यानें या देवीपुढें तप करून तिला प्रसन्न करून घेतलें होतें, अशी दंतकथा आहे. परमारकुलांतील राजपुरुषांची ही कुलदेवता होय.

**श्रीगोपालकृष्ण :** तिसरें प्रसिद्ध मंदिर श्रीगोपालकृष्णाचें हें मंदिर महाराणी बायजाबाई शिंदे यानीं बांधलें आहे पटणीबाजार आणि सब्जीमंडी या दोन पेठा या मंदिराच्या महाद्वाराजवळ एकमेकींस भेटल्या असून सराफपेठ महाद्वारासमोर आहे मंदिराचें बांधकाम दगडी आहे देवाचा गाभारा व त्यावरचें शिखर संगमरवरी असून सभामंडप, चौसोपी, आवाराची फरशी, महाद्वार व नगारखाना हे सर्व भाग काळ्या कुरुदाचे आहेत गाभाऱ्याचें द्वार चांदीच्या पत्र्याने मढविलेलें आहे या द्वाराला दुहेरी कवाडें आहेत आतील कवाडें चांदीच्या पत्र्याने मढविलेलीं असून बाहेरचीं कवाडें चांदीच्या चौकटींत बसविलेल्या हिरव्या-पाढऱ्या दगडाचीं आहेत कांहींशीं मुसलमानी ढंगाचीं वाटणारीं हीं कवाडे गझनी येथें तयार झालेलीं आहेत गाभाऱ्यासमोरचा सभामंडप




प्रशस्त असून तो हंड्या-झुंबरें व विविध प्रतिमा यांनीं शृंगारलेला आहे मंडपाच्या उत्तर-दक्षिण बाजूंस दुमजली दालनें आहेत या मंदिराचें महाद्वार पूर्वाभिमुख आहे त्यावर नगारखाना आहे.

गाभाऱ्यांत गोपालकृष्णाची श्यामल वर्णाची मूर्ति आहे गोपालकृष्णाच्या डावीकडे राधा व उजवीकडे शंकर आहे या तीन मूर्तींच्या डावीकडे गरुडाची मूर्ति असून उजवीकडे गोपालकृष्णाच्या सेविका

महाराणी बायजाबाई यांची शुभ्र संगमरवराची प्रतिमा आहे गोपालकृष्णाच्या हनुवटींत एक तेजस्वी हिरा बसविलेला आहे देवाचे पोशाख, अलंकार, उपकरणीं, नित्यनैमित्तिक पूजा व उत्सव याचा सर्वच थाट राजवैभवाचा आहे गोकुळअष्टमी, गोवर्धनोत्सव ( कार्तिक शु १ ) व हरिहरभेट ( वैकुंठचतुर्दशी ) हे तीन उत्सव येथें होत असतात

**अंकपाद :** उज्जयिनीच्या परिसरात गांवाच्या उत्तरेस दीड मैलावर 'अकपाद' हें एक विशेष पवित्र स्थान आहे भगवान् श्रीकृष्णाचे गुरु महर्षि सांदीपनी यांच्या आश्रमाची ही भूमि उज्जयिनी हें अतिप्राचीन काळापासून विद्येचें एक प्रमुख केंद्र होतें भारतीय संस्कृतीचें संगोपन आणि संवर्धन करणाऱ्या प्राचीन विद्यापीठांत उज्जयिनीचें नाव आदरानें उच्चारलें जाते ज्याने गोकुळातील गवळ्याच्या जीवनांत नवें तेज भरलें, ज्याने अन्यायाविरुद्ध शस्त्र उगारलें, ज्यानें महाभारताचें नायकत्व केलें आणि ज्यानें गीतेचें तत्त्वज्ञान निर्माण केलें, त्या भगवान् श्रीकृष्णाचें विद्याध्ययन येथें सांदीपनींच्या आश्रमात झालें, हा उज्जयिनीचा केवढा गौरव आहे ! श्रीकृष्ण आणि बल-



राम हे दोन कुमार आपल्या समवयस्क सहाध्यायाबरोबर येथें वावरले, येथें त्यांनीं गुरुसेवेचें व्रत आचरलें आणि आपल्या मधुर स्मृतीचा ठेवा या भूमीवर चिरकालासाठीं ठेवला अंकपादाच्या परिसरात आल्यावर अतिप्राचीन भूतकाळातील तीं हृदयंगम दृश्यें दृष्टीपुढें तरळूं लागतात.

विद्याध्ययन सफल्यानंतर श्रीकृष्णानें गुरु सांदीपनींचा हरवलेला मुलगा परत आणून दिला आणि आपली आठवण म्हणून आश्रमाजवळ एक तीर्थ निर्माण केलें. तें तीर्थ म्हणजेच अंकपाद. अकपादतीर्थाला 'विष्णुसागर' असेंहि नांव आहे श्रीकृष्णाच्या पदस्पर्शानें पुनीत झालेली ही भूमि वल्लभसांप्रदायिकांना अत्यंत प्रिय आहे. अंकपादतीर्थाच्या ईशान्येस

सांदीपनींच्या आश्रमाचें स्थान आहे तेथें सांदीपनींची मूर्ति आहे जवळच कुडेश्वराचें मंदिर आहे या शिवमंदिरांत श्रीकृष्ण, बलराम, सुदामा व गुरुदेवाचा पुत्र अशा चार मूर्ति आहेत. आश्रमापुढेंच गोमतीकुंड आहे गुरुदेवाच्या स्नानसध्येसाठीं श्रीकृष्णानें या कुंडात गोमतीचें जल आणविलें, अशी पुराणकथा आहे.



अंकपादतीर्थाच्या पश्चिमेस जनार्दन-मंदिर व राम-मंदिर अशीं दोन मंदिरें आहेत तसेंच वैराग्यांच्या अनेक पंथोपपंथांचे आखाडेहि येथें आहेत

**श्रीअंगारकेश्वर :** अकपादाच्या पुढें सुमारें एक मैलावर क्षिप्रेच्या काठीं अगार-केश्वराचें मंदिर आहे या स्थानाला मंगले-श्वरहि म्हणतात उज्जयिनींतील ८४ सिद्धलिंगांपैकीं हें एक स्थान आहे. उज्जयिनी ही मंगलाची ( अंगारकाची ) जन्मभूमि समजली जाते ज्या जागीं मंगलाचा जन्म झाला, त्याच जागीं हें शिवलिंग स्थापित झालें आहे, असें म्हणतात मंदिर लहानसेंच आहे मंदिरासभोंवतीं दगडी कोट असून, मंदिरासमोर क्षिप्रेला पक्का घाट बांधलेला आहे या घाटाजवळील प्रवाहा-तील स्थानाला 'मगलतीर्थ' असें म्हणतात. दर मंगळवारीं मगलेश्वराच्या दर्शनासाठीं गर्दी होत असते हें स्थान प्रशान्तरम्य असून, येथून दिसणारी क्षिप्रेची शोभा प्रेक्षणीय आहे मंगलेश्वराचा गंगाघाट व त्यावरचें सरदार किब्यांनीं बाधलेलें गंगा-मंदिर दर्शनीय आहे या भव्य घाटावरून दिसणारा क्षिप्रेचा पवित्र प्रवाह आणि तीरापलीकडचा रम्य प्रदेश मनाला मोहून टाकतो

**महाकाली :** हें स्थान उज्जयिनीच्या उत्तरेस एका ओसाड उंच-वट्यावर आहे, त्यामुळें हिला गडावरची कालिका म्हणतात हें मंदिर फार पुरातन असून त्याचा कांहीं भाग इ स ६६० च्या सुमारास सम्राट् हर्षानें बांधलेला असावा मंदिराचा दर्शनी भाग मुसलमानाच्या काळातला आहे जुनें मंदिर घोटीव काळ्या पाषाणाचें असून त्यात हेमाडपंती पद्धतीचे, कोरीव काम केलेले खांब आहेत. मंदिराच्या

महाद्वाराच्या आंत दोहों बाजूंस दोन प्रशस्त सोपे आहेत. या सोप्याच्या गच्ची-वरून प्रवाहिनी क्षिप्रा आणि तिच्या दोन्ही कांठावरील विस्तीर्ण प्रदेश दृष्टिपथांत येतो

या मंदिरातील महाकालीची मूर्ति अत्यंत उग्र-भयंकर आहे तिच्याजवळ चामुंडादेवी व एकादश रुद्रातील गिरीश-रुद्राचें लिंग स्थापिलेलें आहे गाभाऱ्या-समोर आवारात व्याघ्राची प्रतिमा बसवि-लेली आहे. शारदीय नवरात्रात येथें नऊ दिवस उत्सव चालतो वाक्‌सिद्धीसाठीं महाकवि कालिदासानें याच देवीपुढें घोर तप आचरिलें आणि देवीला प्रसन्न करून घेतलें, अशी कथा आहे.



श्रीमहाकालेश्वर-मंदिर (पूर्वेकडून)

या मंदिराजवळ कुमार हनुमान, स्थविर विनायक आणि चतुर्मुख विष्णु अशीं तीन मंदिरें आहेत महाकालीच्या मंदिरासमोर एका जुनाट चिंचेच्या झाडाखालीं विंध्यवासिनी देवीचें स्थान आहे.

**श्रीकालभैरव** : हें स्थान गावाच्या उत्तरेस दोन-अडीच मैलावर आहे. येथें जें एक लहानसें गांव वसलें आहे, त्याला भैरवगड म्हणतात त्याच्या अर्ध्याअधिक भागाला क्षिप्रेच्या प्रवाहानें वेढल्यामुळें गंगाघाटावरून तें एक छोटेंसें बेटच आहे, असें दिसतें या वस्तींत एक भुईकोट किल्ला आहे भैरवगडाच्या नैर्ऋत्येस क्षिप्रेच्या उत्तरतीरावर कालभैरवाचें मंदिर आहे. येथें क्षिप्रेला एक प्रशस्त घाट बांधलेला आहे मंदिराभोंवतीं पक्का कोट असून कोटाच्या आंतील बाजूस चौसोपी आहे. मंदिराचें महाद्वार पश्चिमाभिमुख आहे महाद्वारावर नगारखाना आहे हें सर्व बांधकाम कुणा भद्रसेन नामक राजानें केलें, असें म्हणतात या दुर्लक्षित मंदिराच्या चौसोपींत भग्नावशिष्ट अनेक मूर्ति पडलेल्या आहेत कार्तिक वद्य अष्टमीला येथें उत्सव होतो व यात्रा भरते

**सिद्धवट :** हा पुराणप्रसिद्ध वृक्ष भैरवगडाच्या पूर्वेस नदीकांठीं आहे सध्यांचा वृक्ष शंभर-दीडशें वर्षांइतकाच जुना असेल. परंतु तो मूळ वृक्षाच्या मुळांतून फुटलेला असल्यामुळें प्राचीनच समजला जातो. येथें क्षिप्रेवर एक घाट बांधलेला आहे या सिद्धवटाच्या दर्शनानें भूत-बाधेपासून सुटका होते, अशी लोकश्रद्धा आहे. वैकुंठचतुर्दशीच्या दिवशीं येथें मेळे भरतात निसर्गरम्य परिसरात एकटाच उभा असलेला हा वटवृक्ष आपल्या पुराणपावित्र्यानें दर्शनीय आणि पूजनीय बनलेला आहे.

**देवदेवतांची गर्दी :**

उज्जयिनीचें प्राणभूत स्थान श्रीमहाकालेश्वर हें आहे परंतु येथें इतर शेंकडों देवदेवताची दाटी झालेली आहे. हें प्रामुख्यानें ज्योतिर्लिंगाचें स्थान असल्यामुळें संपूर्ण नगरींत शिवलिंगाचा पसारा खूप आहे येथें अनादिसिद्ध मानलीं जाणारीं ८४ सिद्धलिंगें वा योगलिंगें आहेत हीं सर्व स्थानें अगस्त्येश्वर, गुहेश्वर, ढुंढेश्वर. अशी 'ईश्वर'-पदांकित आहेत. या ८४ सिद्धलिंगांशिवाय क्षेत्रमाहात्म्यात उल्लेखिलेली व न उल्लेखिलेलीं अशीं आणखी सुमारें २५—३० शिवलिंगें आहेत. त्याशिवाय एकादश-रुद्राचीं ११ स्थानें शिवस्थानांतच गणावयास हवीं विनायकाचीं ६ स्थानें, देवीचीं २४ स्थानें, अष्टमातृकांचीं ८ स्थानें, देवीचीं इतर ९ स्थानें व अष्ट-भैरवाचीं ८ स्थानें हीं सर्व 'शैव' स्थानेंच आहेत शिवपरिवाराच्या बाहेरील देवतांपैकीं विष्णूचीं १०, नवग्रहाचीं ९ व मारुतीचीं ४ स्थानें आहेत.



श्रीमहाकालेश्वर-मंदिर
( कोटितीर्थाकडील भाग )

**तीर्थजळांचें पावित्र्य :**

उज्जयिनीला चार नद्यांचें सान्निध्य लाभलें होतें क्षिप्रा, नीलगंगा, गंधवती व नवनदी आज केवळ क्षिप्रेचाच प्रवाह विद्यमान आहे प्राचीन साहित्यांत क्षिप्रेचें नांव 'सिप्रा' वा 'शिप्रा' असें आढळतें. उज्जयिनीचा मध्यभाग नदी–



च्या पूर्वतीराशीं येऊन मिळला असून, त्या भागात नदीवर स्नानासाठी व अन्य कृत्यासाठीं प्रशस्त असे अनेक घाट आहेत हे सर्व घाट वेगवेगळ्या व्यक्तींनीं निरनिराळ्या काळी बांधलेले असूनहि ते सर्व सलग आहेत. या सर्व एकसंध घाटावर क्षिप्रेच्या प्रवाहाला धनुष्याकार प्राप्त झालेला आहे शिवाय घाटाच्या वरच्या बाजूस नदीकाठीं मंदिरें, छत्र्या, मठ, आखाडे याच्या उंचच उंच इमारतींमुळें उज्जयिनीचें संस्कृति-संपन्न पुरातन स्वरूप घाटावरून दृष्टिपथात येतें. विशेषतः परतीरावरच्या वाळवंटात उभें राहून घाटाकडे दृष्टिक्षेप केल्यावर उज्जयिनीचें स्वरूप फारच वेधक वाटतें कालिदासाच्या काळीं क्षिप्रेच्या कांठीं अनेक पुष्पोद्यानें होतीं क्षिप्रेच्या तरंगावरून वाहणाऱ्या शीतल वायुलहरींबरोबर उद्यानातील फुलवेली गंध-गोष्टी करीत होत्या आणि त्या काळातील राजपुरुष आणि रसिक कवि येथील सुगंधित वातावरणांत आनंदानें विहार करीत होते

क्षिप्रेचा साराच प्रवाह तीर्थरूपता पावलेला आहे क्षिप्रेच्या प्रवाहात २८ तीर्थें आहेत याशिवाय उज्जयिनींत तीर्थमहिमा प्राप्त झालेले सप्तसागर आहेत रुद्रसागर ( महाकाल-मंदिर व हरसिद्धि-मंदिर यांच्या-मध्यें ), पुष्करसागर (नलियाबाखळेंत — रंगबावडी), क्षीरसागर ( नगराच्या पूर्वेस डाबरी पीठ्याजवळ ), गोवर्धनसागर ( बुधवाऱ्या हाटात ), रत्नाकर-सागर ( उंडासा नामक नजिकच्या गावीं ), विष्णुसागर ( अंकपादतीर्थ ), पुरुषोत्तमसागर ( अंकपाद दरवाजाजवळ ) हे ते सप्तसागर होत क्षिप्रा-प्रवाहातील २८ तीर्थें आणि ७ सागर याशिवाय उज्जयिनींत ६०—७० ज्ञात-अज्ञात तीर्थकुंडें आहेत

खरें म्हणजे, ईश्वराच्या प्रकटीकरणानें नि संत-महंताच्या वास्तव्यानें पुनीत झालेल्या भूमीचा प्रत्येक अणु आणि प्रत्येक जलबिंदु पवित्रच असतो



## इतिहासाचीं कांहीं पानें :

इतिहासाला ज्ञात असलेला उज्जयिनीचा पहिला राजा प्रद्योत हा मगधवंशीय राजा भगवान् बुद्धाचा समकालीन होता. त्याच्या पराक्रमाचा दरारा सर्वत्र गाजत होता त्यानें एकदा कौशाम्बीच्या वत्सराज उदयनाला युक्तीनें पकडून आणलें परंतु उदयनाच्या संगीतनैपुण्याच्या प्रभावानें प्रद्योतकन्या वासवदत्ता उदयनावर प्रेम करू लागली या वातावरणाचा उदयनाला चांगलाच उपयोग झाला त्यानें आपला राजनीतिज्ञ मंत्री यौगंधरायण याच्या साहाय्यानें वासवदत्तेसह कौशाम्बी गाठली आणि तेथें पोहों-चल्यावर तो वासवदत्तेशीं विवाहबद्ध झाला या उदयन-वासवदत्ता यांच्या प्रणयकथेवर महाकवि भासानें 'स्वप्नवासवदत्त' आणि 'प्रतिज्ञायौगंधरायण' अशी दोन नाटकें लिहिलीं असून, महाकवि कालि-दासानें 'मेघदूता'त या कथेचा जिव्हाळ्यानें उल्लेख केला आहे.

प्रद्योतानंतर तीनशें वर्षांचा उज्जयिनीचा इतिहास ज्ञात नाहीं. इ स. पूर्वीं तिसऱ्या शतकात उज्जयिनी मौर्य साम्राज्यात समाविष्ट झाली. बिंदुसारानें आपला पुत्र अशोक यास उज्जयिनीचा सुभेदार नेमलें होतें. अशोकाच्या शासनाखालीं उज्जयिनीस बौद्ध-विहार आणि धर्मशाळा उभारल्या गेल्या, विद्यालयें स्थापिलीं गेलीं आणि व्यापार-उद्योगांची समृद्धि वाढली.

अशोकानंतर मौर्य सत्तेला उतरती कळा लागली आणि इ स. पूर्वीं दुसऱ्या शतकात पुष्यमित्र शुंगानें मौर्यसत्ता नष्ट करून आपलें स्वामित्व प्रस्थापित केलें पुष्यमित्रानें उज्जयिनीच्या सुभ्यावर आपला पुत्र अग्निमित्र यास नेमलें अग्निमित्रानें आपली राजधानी उज्जयिनीहून विदिशेला हालविली, परंतु तरीहि उज्जयिनीचें वैभव कमी झालें नाही. शुंग राजाच्या कारकीर्दींत उज्जयिनीवरील बौद्ध प्रभाव कमी होऊन हिंदु-धर्माचें प्राबल्य वाढीस लागलें


शुंगांच्या नंतर अवंतिदेशावर पंजाबकडील मालवगणांनीं अधिसत्ता प्रस्थापित केली. रावी नदीच्या तीरीं राहणारे हे मालवगणातील क्षत्रिय अत्यंत पराक्रमी होते भारतीय युद्धांत त्यांनीं कौरवाना साथ दिली होती आणि ग्रीकांच्या आक्रमण-कालांत त्यांनीं जगज्जेत्या शिकंदराच्या निर्भय हृदयातहि भीतीचा कंप निर्माण केला होता. अवंतिदेशात हे मालवगण स्थायिक झाल्यावर अवंतिदेशाचें नांवच 'मालवदेश' असें बनून गेलें मालवानीं आपल्या नांवाचा स्वतंत्र शक सुरू केला, नवीं विजयसूचक नाणीं पाडलीं आणि सर्व शत्रूंना परास्त करून मालवभूमीचें वैभव पराकोटीला नेलें.

इसवी सनाच्या पहिल्या शतकात मालवाची सत्ता शक (क्षत्रप) राजानीं हिरावून घेतली शक राजाच्या काळांतहि उज्जयिनी विद्या, कला आणि व्यापार यांचें श्रेष्ठ केंद्र होतें याच काळात वराहमिहिराच्या नेतृत्वाखालीं येथें वेधशाळेची उभारणी झाली आणि ग्रीक ज्योतिर्विज्ञानाच्या साहाय्यानें भारतीय ज्योतिर्विज्ञानाच्या क्षेत्रांत क्रांति घडून आली.

इसवी सनाच्या चौथ्या शतकात गुप्तवंशीय सम्राट् समुद्रगुप्त याचा मुलगा चंद्रगुप्त याने क्षत्रपांचा नायनाट करून आपल्या साम्राज्याची राजधानी उज्जयिनी येथें आणली चंद्रगुप्तानें आपल्या विजयसंपन्न विक्रमामुळें 'विक्रमादित्य' हें सार्थ बिरुद धारण केलें होतें. त्याचें राज्य सर्व भारतभर पसरलें होतें चंद्रगुप्त 'विक्रमादित्य' हा स्वतः अत्यंत विद्वान्, रसिक आणि विद्या-कलाचा चहाता होता उज्जयिनीच्या विद्वत्परिषदेसमोर त्यानें स्वतः परीक्षा दिली होती कालिदासासारखे श्रेष्ठ कवि त्याच्या आश्रयाला होते त्याच्या काळात हिंदुधर्म, संस्कृत विद्या, स्थापत्य-शिल्प-चित्र-साहित्य इत्यादि कला यांचा परमोत्कर्ष घडून आला शांति आणि सुव्यवस्था यामुळें सारी प्रजा उच्च संस्कृतीच्या स्वीकाराला तत्पर बनली होती या काळांतील भारतीय संस्कृतीची प्रधान क्रीडाभूमि उज्जयिनी हीच होती. महाकवि कालिदासाच्या विश्ववंद्य काव्यकृति म्हणजे या काळातील हर्षोत्फुल्ल अवंतिकेची गौरवगाथाच आहे स्वर्गातील अमरपुरीशीं स्पर्धा

करणारें तें उज्जयिनीचे वैभव कालिदासाच्या काव्यांत शब्दरूपानें चिरंतन बनलें आहे.

गुप्तांच्या पडत्या काळांत उज्जयिनीच्या देवगुप्ताचा आणि कनोजच्या गृहवर्म्याचा संघर्ष झाला. देवगुप्तानें गृहवर्म्यास ठार करून त्याची पत्नी राज्यश्री हिला कारावासात ठेवलें राज्यश्रीचा बंधु ठाणेश्वरचा हर्षवर्धन यानें माळव्याचें राज्य कनोजच्या साम्राज्यांत सामील करून राज्यश्रीला पुनः राज्यारूढ केलें हर्ष आणि त्याची भगिनी बौद्धधर्मीय असल्यामुळें त्यांच्या काळात उज्जयिनींत पुनः बौद्ध धर्माचें प्राबल्य वाढलें असावें



श्रीगोपालकृष्ण-मंदिर

हर्षानंतर मालवदेशानें प्रतिहारांच्या शासनाखालीं काहीं काल काढला. त्यानंतर, इसवी सनाच्या १० व्या शतकात परमारकुलातील मुंजदेव अथवा द्वितीय वाक्पतिराज आणि त्याचा पुतण्या भोजदेव या दोन राजांनीं उज्जयिनीच्या वैभवांत खूप वाढ केली भोजदेव हा तर प्रतिविक्रमादित्यच होता त्याच्या राज्यकाळांत उज्जयिनी आणि तिच्या परिसरात साहित्य, शिल्प आणि वैद्यक-ज्योतिष्यादि विद्या यांची अभिवृद्धि घडून आली, अनेक मंदिरांची आणि सरोवराची निर्मिति त्यानें करविली.

माळव्यावर देवपालदेव हा राजा राज्य करीत असता इ स १२३५ मध्यें दिल्लीचा गुलामवंशीय बादशहा शमसुद्दीन अल्तमश यानें उज्जयिनीवर स्वारी करून सारे नगर लुटलें आणि येथील जुने राजवाडे व प्रेक्षणीय स्थळें उद्ध्वस्त करून महाकालेश्वराची सुवर्णप्रतिमा, विक्रमादित्याचा सोन्याचा पुतळा व इतर अनेक देवतांच्या धातुमूर्ति घेऊन तो दिल्लीस गेला. दिल्लीस जातांना त्यानें महाकालेश्वराच्या मंदिराच्या जागीं

मशीद बांधविण्याचीहि व्यवस्था केली. यानंतर मुसलमानाच्या आक्रमणानीं उज्जयिनीचें वैभव एकसारखें उद्ध्वस्त होऊ लागलें इ स १२९१-मध्यें जलालुद्दीन खिलजीनें उज्जयिनीचा ताबा घेऊन लुटालूट व मोडतोड केली आणि पुढें अल्लाउद्दीन खिलजीनें दक्षिणेकडे जाताना उज्जयिनीचा सर्वतोपरी नाश केला जें नगर पूर्वी स्वर्गाशीं स्पर्धा करीत होतें, त्याला या विध्वंसक आक्रमकानीं नरकाची कळा आणली. खिलजी, तुघलक, मोगल या मुसलमान घराण्याच्या सत्तेखालीं उज्जयिनीचा आत्मा गुदमरून गेला सतत पांच शतकें पारतंत्र्यात पिचणारी उज्जयिनी इ स १७३२ मध्यें मराठ्याच्या सत्तेखालीं आली आणि प्रदीर्घ काळपर्यंत कुचंबलेलें तिचें सांस्कृतिक वैशिष्ट्य पुन: वाढू लागलें मुसलमानी अमलाच्या काळात विलासप्रिय आणि गानवेडा सुलतान बाजबहादुर आणि त्याची प्रिया राणी रूपमती याच्या हकीकती उज्जयिनीच्या जीवनकहाणींत समाविष्ट झाल्या तसेंच मोगलांचा सुभेदार जयसिंह यानेंहि उज्जयिनीवर आपला परिणाम घडविला त्याची वेधशाळा आजहि उभी आहे


उज्जयिनी मराठ्याच्या अधिसत्तेखालीं आल्यावर तिचें प्रत्यक्ष शासन राणोजीराव शिंदे याच्याकडे आलें राणोजीरावांपासून महादजीपर्यंत शिंद्याच्या तीन पिढ्या मुलूखगिरींत आणि राजकारणात व्यतीत झाल्यामुळें शिंद्याना उज्जयिनीच्या विकासाकडे खास लक्ष देतां आलें नाहीं परंतु राणोजीरावाचे दिवाण रामचंद्रबाबा शेणवी यांनीं उज्जयिनीच्या पुनरुद्धाराचा शुभारंभ फार मोठ्या प्रमाणावर केला हल्लीचें महाकालेश्वराचे भव्य मंदिर, अल्तमशानें कोटितीर्थांत लोटून दिलेल्या शिवलिंगाची पुन:स्थापना, उज्जयिनींतील व पंचक्रोशींतील शंभरावर मंदिराचा जीर्णोद्धार, क्षिप्रेच्या कांठावरील प्रशस्त रामघाट व नृसिंहतीर्थावरील घाट हें सर्व कर्तृत्व रामचंद्रबाबाचेंच एकदरींत शिंद्याच्या कारकीर्दींत उज्जयिनीचें संस्कृतिनिष्ठ हृदय स्वतंत्र वातावरणात श्वासोच्छ्वास करूं लागलें आणि नव्या वैभवाची स्वप्नें पाहूं लागलें सन १९२५ मध्यें दिवंगत झालेले श्रीमंत माधवराव शिंदे यानीं तर उज्जयिनीला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. जयसिंहाच्या वेधशाळेचा जीर्णोद्धार, नगरांत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११८६७

सर्वत्र पक्के रस्ते, विजेची व पाण्याची सोय, नगर-स्वच्छता, उद्यान, बाजार-पेठेची नवी व्यवस्था, धर्मशाळा इत्यादि अनेक लोकोपयोगी कामांमुळे त्यांनी उज्जयिनीच्या इतिहासात आपले नांव चिरस्मरणीय बनविले.

**कांहीं प्रेक्षणीय, कांहीं चिंतनीय :**

**कालियादेहाचा महाल :** सिद्धवटाच्या पुढें दोन मैलावर क्षिप्रेच्या प्रवाहांत एक मोठा डोह आहे, त्याला कालियादेह म्हणतात. या डोहाच्या पुढे क्षिप्रेचा प्रवाह दुभंग होऊन पुन: एकत्र झाला आहे आणि त्यामुळे प्रवाहात एक लहानसें बेट निर्माण झालें आहे. या बेटा-



कालियादेह महाल


वर पूर्वी सूर्यनारायणाचें मंदिर होतें आणि त्या पश्चिमेकडील प्रवाहांत मध्यभागीं सूर्यकुंड व ब्रह्मकुंड अशीं दोन तीर्थें होती. इसवी सनाच्या सोळाव्या शतकात माळव्याचा सुलतान नासिरुद्दीन खिलजी याने सूर्य-नारायणाचे मंदिर पाडून त्या जागीं स्वत:च्या विलास-क्रीडासाठीं एक महाल बांधला, तोच 'कालियादेहाचा महाल' या नावानें ओळखला जातो या पठाणी पद्धतीच्या दगडी बांधकामात मूळच्या सूर्यमंदिराचे व कांहीं जैन मंदिरांचे पाषाण असल्याची साक्ष आजहि सहजासहजी पटते या पाषाणांवर उद्ध्वस्त हिंदु मंदिरांच्या कलात्मक खुणा व मूर्ति

जागोजाग आढळतात आणि त्या पाहून मुसलमानांच्या विध्वंसक प्रवृत्तीचा कटु प्रत्यय येऊन मनात विचार-विकारांचें तुफान उठतें या महालाची बांधणी आणि त्यापुढील प्रवाहात बांधकाम करून पाणी खेळविण्याची केलेली आकर्षक व्यवस्था शाही पद्धतीची होती. शिंदे राजघराण्यातील श्रीमंत माधवराव महाराज यानीं या महालाचा जीर्णोद्धार करून आणि त्याच्या परिसरांत कांहीं नवें बांधकाम करून येथें आपलें निवासस्थान बनविलें

**वेधशाळा :** दिल्लीच्या बादशहातर्फे उज्जयिनीचा सुभेदार असलेला जयपूरचा राजा सवाई जयसिंह यानें ही वेधशाळा इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या आरंभीं बांधली ही वेधशाळा उज्जयिनीच्या दक्षिणेस क्षिप्रेच्या तीरावरील एका उंचवट्यावर आहे उज्जयिनी हें फार प्राचीन काळापासून ज्योतिर्विद्येचें आणि ग्रहगणिताचें केंद्र होतें जयसिंहानें स्वत: या वेधशाळेंतील यंत्राच्या साहाय्यानें सात-आठ वर्षेपर्यंत वेध घेऊन, त्यांतील निष्कर्षांच्या आधारें ग्रंथरचना करविली जयसिंहानंतर या वेधशाळेकडे दुर्लक्ष झालें. पुढें श्रीमंत माधवरावाच्या कारकीर्दींत तिचा जीर्णोद्धार होऊन कायम व्यवस्थेची सोय केली गेली हल्लीं या वेधशाळेंत सम्राट्‌यंत्र, नाडीवलययंत्र, दिगंशयंत्र व भित्तियंत्र अशीं चार यंत्रें असून, त्यांच्या साहाय्यानें ज्योतिर्विद्येचें सामान्य ज्ञान संपादन करता येतें हीं चारहि यंत्रें दगड, विटा व चुना यांनीं बांधलेलीं आहेत या यंत्रांचे डोळ्यांना दिसणारें खडबडीत स्वरूप आणि त्याच्या साहाय्यानें कळणारी ग्रहगतींच्या ज्ञानाची सूक्ष्मता याचा विचार मनांत आला कीं, भारतीयांच्या विज्ञानपरंपरा सातत्यानें टिकायला हव्या होत्या, असें राहून राहून वाटतें

**भर्तृहरीची गुंफा :** गडावरच्या महाकालीच्या नैर्ऋत्येस थोड्या अंतरावर क्षिप्रेच्या काठीं भर्तृहरीची गुंफा आहे. या गुंफेचा पूर्वेकडील भाग मातींत लुप्त झाला आहे क्षिप्रेच्या कांठावरून या गुंफेकडे पाहिलें असतां, या गुफेचें स्वरूप असें दिसतें कीं, मध्यें एक चौकोनी मंडप असून त्याच्या चारहि बाजूंस चार दालनें वाढविलीं आहेत. आंतून ही इमारत दुमजली असून तिच्यावर दगडी पटाव आहे खालच्या

मजल्यांत सूर्यप्रकाशाला मज्जाव आहे. त्यामुळें आत जातांना बरोबर विजेरी न्यावी लागते या इमारतीच्या पाहणीवरून व इतस्तत: पडलेल्या अवशेषावरून हें स्थान मूलत: जैनाचें असावें, असें वाटते आंतहि कांहीं जैन मूर्ति आहेत; परंतु आज त्या नाथसिद्धांच्या मूर्ति म्हणून सांगितल्या जातात सध्या हें स्थान नाथपंथीयांच्या ताब्यात असून येथें काहीं कुंडलधारी नाथपंथी जोगी राहत असतात. या जोग्यातील प्रमुखाला 'पीरजी' अशी संज्ञा असते भर्तृहरीच्या गुंफेच्या उत्तरेस दोन मैलांवर नदीतीरीं 'पीर मछदरकी कबर या नांवाचें आणखी एक



वेधशाळा

मुसलमानी ढंगाचें नाथपंथी स्थान आहे इ स बाराव्या शतकांत उज्जयिनीच्या राजघराण्यांतील भर्तृहरि या पुरुषानें गोरखनाथाचें शिष्यत्व पत्करल्यावर नाथपंथाच्या विकासांत उज्जयिनीचें महत्त्व खूप वाढलें भर्तृहरीचा एक काश्मिरी शिष्य बाबा रतनहाजी हा मुसलमान होता शिवाय माळवा, राजस्थान, सौराष्ट्र, कच्छ-काठेवाड या भागांत अनेक मुसलमान नाथपंथाच्या ध्वजाखालीं आले कदाचित् त्याचमुळे — किंवा मुस्लिम राज्यकर्त्यांच्या भयामुळेहि असेल — या स्थानांचें बाह्य स्वरूप मुसलमानी वळणाचें बनलें असावें व नाथजोग्यांना 'पीरजी' ही संज्ञा वापरली जात असावी.

**चोवीसखांबी दरवाजा :** उज्जयिनीच्या दक्षिणेस अगदीं विलग असा जो उंचवटा आहे आणि ज्या उंचवट्याच्या मध्यभागीं श्रीमहाकालेश्वराचें मंदिर आहे, त्याच्याभोंवतीं पूर्वी एक भव्य व मजबूत कोट होता. त्या कोटाचा हा उत्तरेकडील अवशिष्ट दरवाजा होय. त्याच्या दोन्ही बाजू दोन-दोन मजली पडव्यांसारख्या बांधलेल्या असून त्यावर चतुष्कोनी छत उभारलेलें आहे प्रत्येक बाजूस बारा-बारा मिळून एकूण चोवीस



चोवीसखांबी दरवाजा

खांबांवर हा दरवाजा उभा आहे फेरिश्त्याच्या वर्णनानुसार प्राचीन मंदिराभोवतालचा कोट शंभर गज उंच होता अर्थातच हा दरवाजा त्या कोटाला सर्वथा साजेसाच आहे

> सहस्रपदविस्तीर्णं महाकालवनं शुभम् ।
> द्वारं महार्घरत्नाद्यैः खचितं सौम्यदिग्भवम् ॥

असे त्याचे वर्णन प्राचीन ग्रंथांत आढळतें सध्या हा दरवाजा पुराणवस्तु-संशोधन विभागाच्या व्यवस्थेखालीं सुरक्षित आहे

**उत्सव आणि मेळे :**

या पुरातन प्रसिद्ध तीर्थक्षेत्रात मुख्य उत्सव तीन होतात : श्रीगंगादशहरा-उत्सव, श्रीगणपति-उत्सव, शिवरात्रि-महोत्सव श्रीगंगा-दशहरा-उत्सव ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून दशमीपर्यंत दहा दिवस पिशाच्च-मोचनतीर्थावर, रामघाटावर, उदासीच्या मठाखाली व गंधवतीतीर्थावर असा चार ठिकाणीं होतो. दहा दिवस नित्य रात्रीं कीर्तन, मंत्रजागर व शेवटीं ब्राह्मणभोजन असे कार्यक्रम होतात.

श्रीगणेशाचा सार्वजनिक उत्सव भाद्रपदांत ( शुद्ध चतुर्थी ते चतुर्दशी ) श्रीगोपाळ-मंदिरात होतो आणि अखेरच्या दिवशीं विसर्जनाची मिरवणूक थाटामाटानें व वाजत-गाजत क्षिप्रा-तीरीं जाते.

शिवरात्रि-महोत्सव माघ वद्य षष्ठीपासून चतुर्दशीपर्यंत महाकालेश्वराच्या मंदिरांत होतो. या नऊ दिवसांच्या उत्सवाची पर्वणी साधून अनेक भक्त-भाविक दर्शनासाठीं उज्जयिनीस येतात

विशेष पर्वणीच्या निमित्तानें उज्जयिनीस लहानमोठे मेळे भरतात. चैत्र शुद्ध तृतीयेच्या दिवशीं क्षिप्रातीरीं भरणारा गणगौरीचा मेळा, वैशाखी पौर्णिमेस क्षिप्रेच्या कांठीं सकाळींच भरणारा वैशाखी स्नानाचा मेळा, पुरुषोत्तमसागरावर भाद्रपद शुद्ध एकादशीस भरणारा फूलडोलाचा मेळा, कार्तिक शुद्ध पौर्णिमेस क्षिप्रातटीं भरणारा कार्तिकी मेळा, माघ वद्य त्रयोदशीस महाकालेश्वर-मंदिरांत भरणारा महाशिवरात्रीचा मेळा, फाल्गुन वद्य पंचमीस क्षिप्राकांठीं भरणारा निशाणाचा मेळा आणि सिंह राशींत गुरु असतांना वैशाखी पौर्णिमेस क्षिप्रातीरीं भरणारा सिंहस्थाचा मेळा — असे सात मेळे विशेष प्रसिद्ध आहेत

या सात मेळ्यांपैकीं पहिले सहा मेळे प्रतिवर्षी भरणारे असून शेवटचा सिंहस्थाचा मेळा दर बारा वर्षांनीं भरणारा आहे भारतांत बारा राशींचे बारा मेळे निरनिराळ्या नद्यांवर भरण्याची प्रथा प्राचीन काळापासून चालू होती. त्यांतील तीन-चार ठिकाणचे मेळेच सध्यां चालू आहेत. पवित्र नद्यांच्या काठीं पवित्र आत्म्यांचीं संमेलनें भरावींत आणि त्या संमेलनांच्या पर्वणींत पवित्र जलांतील स्नानाबरोबरच पवित्र संगतीचा नि पवित्र ज्ञानाचा लाभ सर्वसाधारण जनांना व्हावा, हाच या मेळ्यांमागील मूळ हेतु असावा वर्तमानकालांतहि या मेळ्यांचें

स्वरूप भव्य असतें, परंतु त्यांतील मूळ हेतु साध्य होत नाहीं. मूळच्या हेतूचा विसर पडलेले शेंकडों बैरागी आणि सामान्य भाविक जन या सिंहस्थ पर्वणीच्या निमित्तानें गर्दी करतात आणि त्या गर्दीच्या गोंधळांत अनेक अनिष्ट घटना घडत राहतात

उज्जयिनीच्या सिंहस्थ मेळ्याचा मुख्य दिवस वैशाखी पौर्णिमा हा होय. या दिवशीं अनेक बैरागी, साधु-संत आणि भाविक जन जमतात. सात-आठ लाखांवर यात्रा लोटते बैराग्यांच्या व अन्य साधूंच्या प्रत्येक आखाड्याचें वेगवेगळें भरजरी रेशमी निशाण असतें. त्याच्या उतरण्याच्या जागा ठरलेल्या असतात. अकपाद येथील मंदिरांत व परिसरात बैरागी उतरतात; क्षिप्रेच्या पैलतीरावरील दत्ताच्या आखाड्यांत गोसावी उतरतात; गंधवतीतीर्थावरील उदाशाच्या मठात व त्यामागें उदासी उतरतात, भर्तृहरीच्या गुंफेवर नाथपंथी जोगी उतरतात, दत्ताच्या आखाड्याजवळ औघड टेकडीवर, रणजित-हनुमानाजवळ व स्मशानात अघोरी उतरतात; राणेखाभाईच्या बागेंत कबीरपंथी व दादूपंथी उतरतात, निर्मळे साधु मुल्लानदारीच्या बागेंत उतरतात व परमहंस हनुमान बागेंत उतरतात

पौर्णिमेच्या दिवशीं बैराग्यांचीं सुमारें चार-पाचशें निशाणें आणि गोसावी-उदासी याचीं साठ-सत्तर निशाणें यांच्या स्नानाचा विधि आणि त्यांच्याबरोबरच्या साधुसंतांच्या स्नानाचा सोहळा क्षिप्रा-तीरावर होत असतो या गर्दीत सामान्य भाविकांना स्नान करणें अशक्य असतें;

**सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।**
**उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम् ॥**

म्हणून ते आदल्या दिवशींच आपला स्नानविधि उरकतात आणि पौर्णिमेच्या दिवशीं नदीकांठचा सोहळा पहावयास येतात या दिवशीं सकाळीं सर्व संत-साधु आपापल्या मुक्कामाच्या ठिकाणांवरून नदीकडे निघतात आणि आपआपलीं निशाणें वाजतगाजत मिरवणुकीनें नदीकाठीं नेतात. प्रत्येक आखाड्याचा नदीकडे येण्याचा व परत जाण्याचा मार्ग ठरवून दिलेला असतो शिवाय मिरवणुकींतील सर्व आखाड्यांचा क्रमहि लावून दिलेला असतो घाटावरील स्नानाच्या जागाहि प्रत्येक आखाड्याला वेगवेगळ्या नेमून दिलेल्या असतात वाद्याच्या गजरात निशाणांचीं खालचीं टोंकें तीर्थात बुडवून निशाणांच्या स्नानाचा विधि साजरा होतो निशाणांचा स्नानविधि उरकल्यावर निशाणें घाटांवर उभीं करून संत-महत स्नानें करतात आणि स्नानानंतर निशाणांचीं पूजा करून पुनः मिरवणुकीनें परत फिरतात भारतातील नानाविध पंथांतील संत-महंतांचें हें प्रचंड संमेलन प्रेक्षणीय असतें. निरनिराळ्या वेशांतील हे संत-महंत पाहिल्यावर यात्रिकाच्या मनांत त्या त्या पंथाच्या संस्थापकाचें जीवन तरळूं लागतें आणि त्या सत्पुरुषांच्या उपदेशांत आणि त्यांच्या या सध्यांच्या अनुयायांच्या आचरणात किती अंतर आहे, याचा विचार मनांत सलूं लागतो शंकराचार्य, गोरक्षनाथ, कबीर, नानक, दादू या महापुरुषाच्या थोर जीवनाची नि पवित्र उपदेशाची निशाणी या निशाणांच्या गर्दींत बहुशः दिसतच नाहीं आणि त्यामुळें बाह्य दृश्यानें दिपलेली दृष्टि हळूहळू त्या दृश्यावरून माघारी फिरते आणि त्या भूतकालांतील महापुरुषांच्या चरणीं स्थिरावते

क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति :

तीन तपांपूर्वीं एका अवन्तिकावासी लेखकानें उज्जयिनीचा महिमा गातांना लिहिलें आहे : " भारतवर्षास आचंद्रार्क भूषणभूत होऊन राहणाऱ्या प्राचीन नगरींच्या मालिकेंतहि ही नगरी आज अग्रेसरत्वानें सन्निविष्ट होऊन बसली आहे गतकालीं वित्त, विद्या व विक्रम या त्रयीचा जेथें कळस झाला, धार्मिक वैभवाबद्दल दिगन्त कीर्ति संपादून प्रतिकैलास म्हणून जी गाजली, सुसमृद्ध मालवदेशाच्या भागधेयाशीं जिनें शतकानुशतकें क्रीडा केली, ती हीच महिमामय उज्जयिनी होय अतिप्राचीन कालापासून तों तहत गेल्या शतकाच्या पहिल्या शतकापावेतों ह्या नगरीनें मालवदेशाच्या राजधानीचें पद प्रतिष्ठापूर्वक उपभोगिलें होतें. प्रजानुरंजन-

दक्ष नृपति, देवोपम महात्मे, 'विद्याधर्मसुकर्मतत्पर' ब्राह्मण, समरधुरंधर क्षत्रिय व धनकनकसंपन्न वैश्य यांच्या स्पृहणीय कर्मकौशल्यानें या नगरीला सकलैश्वर्यांचा उपभोग गतकालीं जितक्या अधिकतेनें घेतां आला, तितका भारतवर्षाच्याच काय, पण जगांतील यच्चयावत् राष्ट्रांच्या तत्कालीन राजधान्यांना क्वचितच घेतां आला असेल ! या नगरीचा त्या वेळचा यशोमहिमा शूद्रकाच्या 'मृच्छकटिका'तून, कालिदासाच्या 'रघुवंशां'तून किंवा 'मेघदूता'तून, पद्मगुप्ताच्या 'नवसाहसाङ्कचरिता'तून, बाणाच्या 'कादंबरीं'तून, सोमदेवाच्या 'कथासरित्सागरां'तून अथवा राजशेखराच्या 'बालरामायणां'तून ऐकला, म्हणजे आजच्या विपन्न स्थितींतहि

तिच्याविषयीं अंत:करणांत विशेष आदर उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. या नगरींतील पूर्वकालीन कांचनकलशांनीं गगनवितानें सांवरून धरणारीं उंच देवालयें, सुवर्णशिखरांनीं मंडित असलेले प्रोत्तुंग प्रासाद, निर्व्याज-मनोहर नाट्यशाला व चंद्रशाला, धनसंपन्न वणिग्जनांचीं व कलाकोविदांची सुंदर सदनें, विश्वविश्रुत विद्यापीठें, नंदनवनोपम उद्यानें — सगळीं सगळीं आज धूलिसात् झालीं असलीं, नामशेष बनलीं असलीं, तरी पूर्वोक्त ग्रंथांतील वर्णनें वाचतां वाचतांच त्यांचीं कल्पनानिर्मित चलच्चित्रें चित्तपटला-वर आपोआप उमटून मनोवृत्ति प्रफुल्ल होतात.

राजशेखराच्या 'काव्यमीमांसे'त अवन्तीच्या विद्यापीठाची महती गाइली असून, शूद्रकाच्या 'मृच्छकटिकां' तील वर्णनावरून ही नगरी महदैश्वर्यशाली असल्याचें कळतें. टॉलेमीनेंहि तिच्या वैभवाचें वर्णन केलें आहे. पेरिप्लसनें भारतीय व्यापाराचें केंद्रस्थान म्हणून तिची स्तुति गाइली आहे. इ. स १५८५ त रॉबर्ट फीच नांवाचा एक इग्लंडचा प्रवासी स्वत: येथें येऊन गेला. त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत येथें कपडे व अफू यांचा व्यापार फार मोठा होत असल्याचें उल्लेखिलें आहे. अशोकाच्या एका स्तंभोत्कीर्ण लेखांत इतरत्र पांच-पाच वर्षांनीं भरणारे मेळे उज्जयिनीस तीन-तीन वर्षांनीं भरवावे, असें उन्मेखून सागितलें आहे. येथील स्त्रियांच्या सौंदर्याचें यथार्थ वर्णन 'बालरामायणा'त व 'कामसूत्रा'त केलेलें आहे. पूर्वकालीं येथील राजांनीं अनेक पंडितांचा परामर्श घेऊन, कला, शास्त्रें, काव्य व साहित्य याचा ' न भूतो न भविष्यति ' असा उत्कर्ष केला त्या राजाश्रित पंडितमंडळांत कालिदासादि नवरत्नें प्रमुख होत. त्या नव-रत्नातील वराहमिहिर याचा जन्म माळव्यात उज्जयिनीपासून जवळच असलेल्या कपित्थ ( कायथा ) गांवीं झाला असल्याचें निर्विवाद सिद्ध होतें. वराहमिहिराचें सर्व आयुष्य व कर्तृत्व याच उज्जयिनींत फलद्रूप

पुरी रक्षतां देवकन्याथ काञ्ची सितः पर्वतः पर्यली वत्सगुल्मम् ।
पुरी चोज्जयिन्याह्वया गर्गराटं कुरुक्षेत्रमेरू भुवोमध्यरेखा ॥


झालें. भोजराजाच्या आश्रयास राहून गुर्जरपंडित उवट यानें जें शुक्ल-यजुर्वेदावर भाष्य केलें, तें येथेंच होय."

**उज्जयिनीचें पुनरुज्जीवन :**

चार-सहा हजार वर्षांचा इतिहास मिरवणारी ही पुण्यवान् नगरी आज नवजीवनाचीं स्वप्नें रंगवीत आहे. क्षिप्रेच्या हृदयात साठव-लेल्या त्या सर्व सोनेरी स्मृति पुनः साकार होण्यासाठीं धडपडत आहेत. एवढें प्रचंड वैभव आणि संस्कृतीचें भांडार बाळगणारी ही नगरी पुनरुज्जीवनासाठीं उत्कंठेनें वाट पाहत आहे आजवर तिनें जें भोगलें-अनुभवलें, त्यांतील सुवर्णकण वेंचून पुनः कांहीं दिव्य-भव्य घडवून दाखवावें, अशी प्रबळ इच्छा तिच्या अंतरंगांत दाटली आहे

— आणि आश्चर्याची व अभिमानाची गोष्ट म्हणजे उज्जयिनीच्या पुनरुज्जीवनासाठीं भारत सरकारनें पुढाकार घेतला आहे भगवान् श्रीकृष्णाच्या विद्याध्ययनानें चिरंतन बनलेल्या सांदीपनीच्या आश्रमाच्या जागीं एक नवें विद्याकेंद्र — भारतीय परंपरेचें ज्ञान देणारें केंद्र — उभें रहावयाचें आहे शिवाय ज्या उज्जयिनींत कालिदासाची काव्यकला फुलली-खुलली, त्या उज्जयिनींत प्रतिवर्षी कालिदास-महोत्सव होऊं लागला आहे नवभारतानें आपला प्रातिनिधिक राष्ट्रीय कवि म्हणून कालिदासाला मान्यता दिली आहे आपल्या संस्कृतींतील सर्वश्रेष्ठ गुणाचें रसायन कालिदास-साहित्यांत आहे. त्यामुळें भारताचा सांस्कृतिक प्रतिनिधि बनलेला हा महाकवि ज्या भूमींत नांदला, त्या उज्जयिनीचें हृदय अभिमानानें भरून आल्याशिवाय राहणार नाहीं. उज्जयिनीचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे !

'उज्जयिनी' या नांवांतच या नगरीच्या उज्ज्वल भवितव्याची ग्वाही आहे. 'उज्जयिनी' म्हणजे विजयी नगरी — उत्तुंग यश प्राप्त करणारी नगरी. उज्जयिनीचा प्राचीन यशोगरिमा जितका उज्ज्वल आहे, तितकीच तिच्या भविष्यकालीन उज्ज्वलतेची निश्चिति आहे. जिच्या आश्रयानें गुप्त सम्राटांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें, महाकवि शूद्रकानें जिचें भावगर्भ अंतरंग शब्दांत साकार केलें, विश्वविख्यात ज्योतिर्विद् वराहमिहिर यानें जेथून ग्रहगोलांचे वेध घेतले आणि महाकवि कालिदासानें दिक्कालाचा भेद करून अनंताच्या शिखरावर आरोहण केलें, ती उज्जयिनी निःसंशय अमर आहे — अमर आहे — अमर आहे !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 39998 वि: 
क्रमांक 2८५ नों दि: ८।८।६९

मराठी ... क्र. ११८०७ ... ग्रंथ शाळा

## यात्रिकांसाठीं आणखी माहिती

**क्षेत्रफळ :** ६४१५ चौरस मैल.

**लोकसंख्या :** १२,९८१७.

**समुद्रसपाटीपासून उंची :** १६८० फूट.

**हवामान :** हिंवाळ्यांत सौम्य आणि प्रसन्न, उन्हाळ्यांत उष्ण. पाऊस सरासरी ४५ इंच.

**हवामानानुसार कपडे :** उन्हाळ्यांत सुती आणि हिंवाळ्यांत पातळ लोकरीचे

**भाषा :** हिंदी, इंग्रजी.

**जाण्याची सोय :** मुंबईहून — रेल्वेनें ६३५ मैल. मोटारनें ४१९ मैल मार्ग : नाशिक, धुळें, महू, इंदूर आणि देवास

**उतरण्याच्या सोयी :** ( १ ) जीजामहाराजांची धर्मशाळा : रेल्वे-स्टेशनपासून एक फर्लांगावर. सर्वांसाठीं खुली. भाडें नाहीं तीन दिवस राहतां येतें पाण्याची उत्तम सोय व्यवस्थापकांकडे मागणी केल्यास भांडींहि मिळतात धर्मशाळेजवळ आवश्यक त्या वस्तु मिळण्याची सोय ( दुकानें ) आहे. जवळच खानावळीहि आहेत.

( २ ) गांवांतील धर्मशाळा : गावांतहि नदीकांठीं व हरसिद्धि-दरवाजाजवळ अशा दोन धर्मशाळा आहेत.

( ३ ) ग्रँड हॉटेल — डाक बंगला . येथें एका माणसाला प्रत्येक खोलीला दिवसाला ३ ते ६ रुपयांपर्यंत विशिष्ट श्रेणीनुसार भाडें पडतें. एका माणसानें एक खोली भाड्यानें घेतल्यावर त्याच्याबरोबरच्या प्रत्येक माणसामागें फक्त आठ-आठ आणे भरावे लागतात

**गांवांतील वाहनें :** गांवात टॅक्सी व टांगा हीं दोन प्रकारचीं वाहनें मिळतात. देवास-दरवाजा व गोपाळ-मंदिर हीं वाहनें उभीं राहण्याचीं दोन प्रमुख स्थानें आहेत.

REFBK-0011401

# सांस्कृतिक भारत दर्शन

## पहिला संच : पांच पुस्तकें : ४ रुपये

१. जागृत जगन्नाथ
जगन्नाथपुरी

२. क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति
उज्जयिनी

३. त्रिभुवनेश्वर लिंगराज
भुवनेश्वर

४. भगवान कोणादित्य
सूर्यक्षेत्र कोणार्क

५. श्रीचैतन्य-लीलाधाम
नवद्वीप

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

आसेतु हिमाचल पसरलेल्या विशाल
भारत भूमींतील संस्कृति-केन्द्रांचा
सविस्तर, साधार, सचित्र परिचय.
पन्नास पुस्तकांचा विराट् संकल्प

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लिमिटेड, मुंबई २